सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ६७

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

( महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण )

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

क्रमांक : मजनिप्रा/२०१९/ प्र.क्र.११/२०१९/२२३

दिनांक ६/३/२०२०

प्रकरण क्रमांक ११/२०१९

**अर्जदार कंपनीला त्यांचा नाशिक औष्णिक वीज एकलहरे, करिता दुषित पाण्याचा पुरवठा करण्यासाठी पाणी दराची निश्चिती करण्याच्या विषयात, तसेच प्राधिकरणाच्या आदेश क्र. १२/२०१७, जो दि. १३/१०/२०१७ ला जारी करण्यात आला होता. त्याच्या तर्काधिष्ठित उपपत्तीवर आधारलेल्या समानतेवर केलेला दावा, इ. विषयी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी म. नाशिक थर्मल औष्णिक वीज केंद्र, एकलहरे यांनी दाखल केलेली याचिका –**

या सोबत दि. ०५/०३/२०२० चा मजनिप्रा आदेश क्र ०३/२०२० जोडला आहे.

सहपत्र : वरील प्रमाणे.

**स्वाक्षरित**
**(डॉ. रामनाथ सोनावणे)**
**सचिव, मजनिप्रा**

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel.: + 91-22-2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in Website : www.mwrra.org

प्रति :

१) मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, म., नाशिक औष्णिक वीज केंद्र, एकलहरे, जि. नाशिक–४२२१०५

२) सचिव, (ज. सं. व्य व लाभक्षेत्र विकास) ज. सं. वि. मंत्रालय, मुंबई व इतर.

३) मुख्य अभियंता, ज. सं. वि. सिंचन भवन, त्र्यंबक रोड, नाशिक

४) अधिक्षक अभियंता, लाभ क्षेत्र विकास प्राधिकारी, ज. सं. वि. दुसरा माळा, सिंचन विभाग, त्र्यंबक रोड, नाशिक

५) कार्यकारी अभियंता, ज. सं. वि. नाशिक सिंचन विभाग, त्र्यंबक रोड, नाशिक

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

( महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण )

**Maharashtra Water Resources Regulatory Authority**

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra
Water Resources Regulatory Authority Act, 2005)

आदेश क्रमांक : ०३/२०२०

(प्रकरण क्रमांक ११/२०१९)

**अर्जदार कंपनीला त्यांचा नाशिक औष्णिक वीज एकलहरे, करिता दुषित पाण्याचा पुरवठा करण्यासाठी पाणी दराची निश्चिती करण्याच्या विषयात, तसेच प्राधिकरणाच्या आदेश क्र. १२/२०१७, जो दि. १३/१०/२०१७ ला जारी करण्यात आला होता. त्याच्या तर्काधिष्ठित उपपत्तीवर आधारलेल्या समानतेवर केलेला दावा, इ. विषयी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी म. नाशिक थर्मल औष्णिक वीज केंद्र, एकलहरे यांनी दाखल केलेली याचिका –**

मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, म.,

नाशिक औष्णिक वीज केंद्र, एकलहरे, जि. नाशिक–४२२१०५

**.....याचिकाकर्ता**

विरुद्ध

१) सचिव, (ज. सं. व्य व लाभक्षेत्र विकास) ज. सं. वि. मंत्रालय, मुंबई व इतर.

२) मुख्य अभियंता, ज. सं. वि. सिंचन भवन, त्र्यंबक रोड, नाशिक

३)　अधिक्षक अभियंता, लाभ क्षेत्र विकास प्राधिकारी, ज. सं. वि. दुसरा माळा, सिंचन विभाग, त्र्यंबक रोड, नाशिक

४)　कार्यकारी अभियंता, ज. सं. वि. नाशिक सिंचन विभाग, त्र्यंबक रोड, नाशिक

**.....प्रतिवादी**

**कोरमः— श्री. के. पी. बक्षी, अध्यक्ष**

**श्री. व्ही. एम. कुळकर्णी,**

**सदस्य, (ज.सं. अभियांत्रिकी)**

**श्री. विनोद जे. तिवारी, सदस्य, (विधि)**

**अंतिम सुनावणी : दि. १०/१०/२०१९**

**निवाडा दिला : दि. ०५/०३/२०२०**

**पार्श्वभूमि**

१)　महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, म. (MSPGCL) यांनी नाशिक औष्णिक वीज केंद्र (NTPS), एकलहरे गावाजवळ जि. नाशिक, महाराष्ट्र, सन १९७७ मधे बांधले. N.T.P.S. ने गोदावरी नदीवर, एकलहरे गावाजवळ, गंगापूर धरण व नाशिक शहराच्या खालच्या प्रवाहात, बंधारा बांधला ज्याची साठवण क्षमता ६९ द.ल.घ. फुट आहे. N.T.P.S. चे दोन टप्पे आहेत, टप्पा क्र. १ — २ X १४० मे. वॅ. (एकूण २८० मे. वॅ.) आणि टप्पा क्र. २ — ३ X २१० मे. वॅ. (एकुण ६३० मे. वॅ.).

२)　जल संपत्ती विभागाने १९७७ मधे गोदावरी नदीतून एकलहरे गावाजवळ १२०० द.ल.घ. फुट पाणी घेण्याची परवानगी दिली आहे. सध्या NTPS टप्पा एक बंद करण्यात आला आहे व टप्पा—२ मधून ६३० मे. वॅ. वीज निर्मिती होत आहे. NTPS ने टप्पा—१ बंद केल्यावर, त्यांनी ज.सं. विभागाला

५०० द.ल.घ.फु. पाणी न घेण्याचे ठरवुन, ते पाणी बंद करण्यास सांगितले. आता NTPS चा कार्यकारी अभियंता, नाशिक सिंचन विभाग, जल संपत्ती विभाग यांच्या बरोबर ७०० द.ल.घ.फु. पाणी पुरवठयाचा करार झाला आहे. या कराराचा अवधी ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२४ पर्यंत आहे.

३) मे. रतन इंडिया, नाशिक पावर लि. (RNPL) यांना १९० दल लि. प्र. दि. पुर्नचक्रित पाणी नाशिक महानगर पालिका (नामपा) आस्तित्वात असलेल्या MSPGL च्या एकलहरे बंधाऱ्यातून सोडते. RNPL ने याचिका (प्र.कि. ८/२०१६) प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा दर निश्चित करण्यासाठी मजनिप्राकडे दाखल केली होती. म.ज.नि.प्रा. ने त्याचा आदेश क्र. १२/२०१७, दि. १३/१०/२०१७ प्रमाणे RNPL साठी दरामधे २५ टक्के कपात करण्यास मंजुरी दिली होती. हा आदेश प्रकरण विनिर्दिष्ट होता जो त्यावेळी असलेल्या विलक्षण सत्यस्थिति व प्रसंगावर आधारित होता.

४) ज्या अर्थी पाणी घेण्याचा RNPL व NPPS चा मुल स्त्रोत एकच आहे जो म्हणजे एकलहरे बंधारा. त्यामुळे RNPL ने या समानतेच्या आधारावर प्रस्तुत याचिका प्राधिकरणाकडे दि. ०६/०५/२०१९ ला दाखल केली. ज्यामधे २५ टक्के सुट मिळण्यासाठी विनंती केली आहे.

५) या सारखी याचिका या अर्जदाराने पुर्वी देखील दाखल केली होती. तथापि ती याचिका त्यावेळेस अर्जदाराने ज.सं. विभागाशी वैध करार केलेला नव्हता, या कारणाने अर्जदार अर्ज करण्यास पात्र ठरत नव्हते. त्यामुळे याचिका नाकारून प्रकरण निकालात काढले होते.

## प्रार्थनेचा सारांश

६) याचिका कर्त्याने त्याच्या याचिके मार्फत खालील प्रमाणे अनुतोष मागितला आहे.

१) ही याचिका प्राधिकरणाच्या प्र.क्र. १/२०१८ च्या आदेश क्र. ०५/२०१८ नुसार या प्रकरणाचा भाग समजण्यात यावी आणि त्याप्रमाणे दुषित पाण्याचा पुरवठा करण्यासाठी सवलतीचा दर

N.T.P.S. महाजेनकोसाठी त्याच्या नाशिक औष्णिक वीज केंद्र एकलहरेसाठी, पुर्वानुलक्षी प्रभावाने २६/०२/२०१८ पर्यंत लागु करावा.

२) हा पाणी दर, RNPL व N.T.P.S. या दोन एककांनी तेच पाणी एकाच स्त्रोतापासुन व एकाच प्रकारच्या वापरासाठी म्हणजे वीज निर्मिती करिता, निश्चित करावा आणि त्यासाठी २५ टक्के सवलत असणारा हा सुधारित दर लावावा जो मा. प्राधिकरणाच्या १३ एप्रिल २०१२ च्या आदेशानुसार प्रकरण क्र. ५/२०११ व १३ ऑक्टोबर, २०१७ च्या त्यांच्या आदेशानुसार क्र. १२/२०१७ प्रमाणे गोदावरी नदीचे दुषित पाणी जे एकलहरे बंधाऱ्यातून वीज निर्मितीसाठी RNPL च्या प्रकरणात घेतले जाते.

३) न्यायाच्या हितार्थ कोणताही एखादा अनुतोषु जो मा. प्राधिकरणाला योग्य वाटेल असा देण्यात यावा.

**प्राधिकरणासमोर चाललेले कामकाज**

७. याचिका दाखल केल्यानंतर, प्राधिकरणाने त्यांच्या १६/०८/२०१९ च्या पत्राने सर्व प्रतिवादींना अनुच्छेद गणिक शपथपत्र, उत्तराकरिता, दाखल करण्याचे आदेश दिलेत. त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता NID नाशिक, यापुढे प्रतिवादी क्र. ४, यांनी उत्तराकरिता शपथ पत्र दाखल केले. हे शपथ पत्र प्रतिवादी क्र. २ ते ४ मार्फत दि. ३०/०९/२०१९ चे आहे. यानंतर प्राधिकरणाने या प्रकरणात एक सुनावणी दि. १६/१०/२०१९ ला घेतली व सर्वांना समान व पुरेपुर संधी त्यांची बाजु मांडण्याकरिता व त्यांचे प्रकरण गुणवत्तेवर प्रस्तुत करण्यासाठी देण्यात आली व पक्षकारांच्या संमतीने या प्रकरणात सुनावणी घेवुन, न्यायाच्या हितार्थ, प्रकरण निकालात काढण्यात आले.

**दि. १६/१०/२०१९ च्या पहिल्या व अंतिम सुनावणीचा सारांश**

८) या सुनावणीला श्री. व्ही. ए. मोरे, कार्यकारी अभियंता, नाशिक औष्णिक वीज केंद्र, एकलहरे, श्री. आर. सी. दशोरे, याचिकाकर्त्याचे संमंत्रक श्री. आर. एम. मोरे अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्रविकास प्राधिकरण हे प्रतिवादी २ व ३ साठी आणि श्रीमती वैशाली कुरणे, अवर सचिव, जल संपत्ती विभाग, मुंबई, प्रतिवादी क्र. १ मार्फत हजर होते.

९) श्री. आर. सी. दशोरे याचिक कर्त्या मार्फत यांनी सादर केले की याचिकाकर्ते यापुर्वी प्राधिकरणासमोर हजर झाले होते व त्यावेळी प्र.क्र.१/२०१८, दि. २३/०१/२०१८ ची याचिका दाखल केली होती. तथापी, त्यावेळी प्राधिकरणाने दि. २६/०३/२०१८ च्या आदेश क्र. ०५/२०१८ अन्वये मी याचिका निकालात काढली होती. त्यावेळेस अर्जदाराने ज.सं. विभागाशी वैध करार केलेला नव्हता. या कारणाने अर्जदार अर्ज करण्यास पात्र ठरत नव्हते. त्यामुळे याचिका नाकारून प्रकरण निकालात काढले होते आणि प्राधिकरणाने त्यांना नवीन याचिका, याचिकाकर्ते प्रकरण दाखल करण्यास पात्र ठरल्यानंतर, दाखल करण्याची मुभा दिली होती. त्याप्रमाणे आता NTPS चा कार्यकारी अभियंता, नाशिक सिंचन विभाग, जल संपत्ती विभाग यांच्या बरोबर ७०० द.ल.घ.फु. पाणी पुरवठयाचा करार झाला आहे. या कराराचा अवधी ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२४ पर्यंत आहे.

१०) त्यांनी पुढे सांगितले की एकलहरे बंधारा हा नाशिक शहराच्या खालच्या प्रवाहात स्थित असुन सांडपाणी प्रक्रिया संयंत्रातुन सर्व प्रक्रिया न केलेले पाणी एकलहरे बंधाऱ्यात येते. गोदावरी नदीच्या प्रदुषणाचा मुद्दा जनहित याचिका क्र.१७३/२०१२ मधे मा. उच्चन्यायालय, मुंबई समोर आला होता. प्राधिकरणाने चौकशी केली असता त्यांनी सांगितले की मा. उच्च न्यायालय,

मुंबईच्या निर्णयात पाणी दराविषयी काही उल्लेख नाही कारण जनहित याचिके मधे मुख्य मुद्दा गोदावरी नदीच्या प्रदुषणाचा होता.

११) त्यांनी पुढे सांगितले की, RNPL आधीचे (इंडियाबुल्स रिअलटेक लि.) यांनी याच भागात औष्णिक वीज केंद्र संयत्र बांधले असुन त्यांना गोदावरी नदीच्या एकलहरे बंधाऱ्यातुन पाणी घेण्याची परवानगी आहे. RNPL या प्राधिकरणाकडे प्र.क. ५/२०११ मार्फत जाऊन पुनर्चक्रित सांडपाण्यावरील दर कमी/माफ करण्याची विनंती केली. प्राधिकरणाने त्यांच्या दि. १३/०४/२०१२ च्या आदेशानुसार दरामधे २५ टक्के सवलत दिली. प्राधिकरणाने सांगितले की त्यांच्या घाऊक दर आदेश, २०११ प्रमाणे प्राधिकरणासाठी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याबद्दल काही तरतुद नाही परंतु प्राधिकरण (निष्कर्ष निश्चित करणे व घाऊक पाण्याचा दर लागु करणे) नियमन २०१० प्रमाणे प्राथिकरणाने RNPL ला दर माफी देण्याची मंजुरी दिली. प्राधिकरणाने चौकशी केली, तेव्हा श्री दशोरे यांनी सांगितले की वर्ष २०११ मधे ते प्राधिकरणाकडे आले नाही पण दर माफी देण्यासाठी शासनाकडे गेले होते.

१२) प्राधिकरणाने विचारले की जर NTPS नाशिक शहराच्या ULB च्या सांडपाणी प्रक्रिया संयत्रापासुन ११ कि.मी. दुर आहे तर सांडपाणी प्रक्रिया संयत्रापासुन सरळ पाईप लाईन, भारत सरकारच्या दर नीतीच्या अधिसुचनेप्रमाणे आणि राज्यशासनाच्या औष्णिक वीज केंद्राच्या नीतीप्रमाणे टाकायला हवी होती. श्री. दशोरे यांनी सांगितले की सांडपाणी प्रक्रिया संयंत्र हा कांही पाण्याचा खात्रीलायक स्त्रोत नाही आणि भारत सरकारच्या दर नीती, २०१६ प्रमाणे, त्यांना कायम स्वरूपी पाण्याच्या स्त्रोतासाठी वैकल्पिक योजना करणे गरजेचे आहे.

१३) श्री. आर. एम. मोरे प्रतिवादी क्र. ३ यांनी सांगितले की, RNPL ला सांडपाणी प्रक्रिया संयंत्र पासुन पाण्याचे आरक्षण दिले आहे तर NTPS ला हे आरक्षण गंगापूर धरणाच्या पाण्याचे मिळाले

आहे. गंगापूर धरणातुन फक्त अवर्षणामुळे वर्ष २०१६ चा अपवाद सोडल्यास, पाणी दरवर्षी सोडण्यात येते

१४) प्राधिकरणाने केलेल्या चौकशीवर श्री. दशोरे यांनी सांगिते की, त्यांना जी सवलत पाहिजे आहे ती २७ फेब्रुवारी २०१८ च्या आधीची आणि सवलतीची रक्कम ६ वर्षाकरिता प्रत्येकी ३० करोड रूपये होते. श्री. मोरे यांनी सुद्धा सादर केले की, त्यांनी बाकी असलेली दंडात्मक रककम ७२.८१ करोड रू. भरलेली नाही. श्री. दशोरे म्हणाले की फक्त १५.८२ करोड रू. ची रक्कम बाकी आहे, ज्याकरिता योग्य तो मेळ बसविण्यासाठी गरज आहे.

१५) सुनावणी दरम्यान अर्जदाराच्या वकीलाला विचारले की महाराष्ट्र वीज नियमन आयोगाकडे (MERC) वीज उर्जा दराचा प्रस्ताव सादर करतांना त्यांनी या मिळु शकणाऱ्या सवलतीच्या परिणामाचा विचार केला आहे काय ? जर नाही, तर अर्जदार कां अशा पाणी दरावर सवलतीची मागणी करीत आहे, जर त्यांनी हा दर आधीच निश्चित केला असुन परत मिळवला आहे/लावला आहे? अर्जदराचे वकील यावर समाधानकारक उत्तर देवु शकले नाही, विशेषता १३ एप्रिल २०१२ ते १५ ऑक्टोबर २०१८ च्या काळाकरिता ज्यासाठी सवलत मागितली आहे, जरी त्या काळाचे वीज दर त्यांनी ग्राहकांकडून घेतले आहेत/वसुल केले आहेत.

या आधारावर की जलसंपत्ती विभागाने त्यांच्याकडून गंगापूर धरणातुन स्वच्छ पाणी घेतल्याबद्दल बील लावले आहे. ग्राहकांकडून घेतले आहेत/वसुल केले आहेत अशाप्रकारे, प्राधिकरणाचे मते जर पुर्वानुलक्षी प्रभावाने १३ एप्रिल २०१२ ते १५ ऑक्टोबर २०१८ च्या काळाकरिता जर गृहित तत्वानुसार विचार केला तर अर्जदार हे ग्राहकांकडून वसुल केलेल्या पैशामुळे अन्याय्य पद्धतीने श्रीमंत होते जेव्हा MERC ने वीजदर ठरवतांना या सवलतीचा विचार

केलेला नव्हता. म्हणून प्राधिकरणाचे असे मत आहे की अशी अन्याय्य पद्धतीने पैसे मिळवण्याची परवानगी देता येणार नाही.

१६) वादातील सर्व पक्षांचे मत ऐकल्यावर, प्राधिकरणाने युक्तिवादावर लिखित बयाण देण्यास, जर त्यांना द्यायचे असल्यास, सांगितले व अंतिम आदेशाकरिता सुनावणी बंद करण्यात आली.

## मुद्दे साचेबद्ध करणे

१८) या प्राधिकरणाने अर्जात दिलेल्या विषयांचा विचार करून व पार्टीने सादर केलेले त्यांचे म्हणणे, जी कागदपत्रे अभिलेखात आहे, इ. चा विचार करून निवाडयासाठी जे मुद्दे समोर आले आहेत, ते असे आहेत.

**१) अर्जदार ही याचिका दाखल करण्यास पात्र ठरतात काय?**

**२) प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात या प्रकरणावर निवाडा करणे बसते काय ?**

**३) याचिकाकर्ते २५ टक्के सवलत, समानतेच्या आधारावर व पुर्वानुलक्षी प्रभावाने मिळण्याचे हक्कदार आहे काय ? जर होय, तर कोणत्या काळाकरिता?**

**४) येथे दुसरा कोणता मुद्दा विचारात घेण्यायोग्य, या प्रकरणासोबत, आहे काय ? जर होय, तर कसा ?**

## प्राधिकरणाचे निष्कर्ष

प्राधिकरणाने केलेल्या युक्तिवादाचे व सादरीकरणाचे व अभिलेखात असलेली कागदपत्रे ई. चा विचार करून वरील मुद्दांवर निवाडा दिला आहे.

प्राधिकरणाचे निष्कर्ष असे आहेत.

**१. अर्जदार ही याचिका दाखल करण्यास पात्र ठरतात काय?.**

अ) याचिकाकर्ते यापुर्वी प्राधिकरणासमोर हजर झाले होते व त्यावेळी प्र.क्र.१/२०१८, दि. २३/०१/२०१८ ची याचिका दाखल केली होती. त्यावेळेस संधी देवुनही अर्जदार त्यांची

पात्रता सिद्ध करू शकले नाही. या उलट त्यांनी सांगितले ज.सं.विभागाबरोबर जो करार झाला होता तो १६ ऑक्टोबर २०१६ ला संपुष्टात आला. अशा तऱ्हेने ती याचिका केली त्यावेळेस अर्जदाराने ज.सं. विभागाशी वैध करार केलेला नव्हता. या कारणाने अर्जदार अर्ज करण्यास पात्र ठरत नव्हते. त्यामुळे याचिका नाकारून प्रकरण निकालात काढले होते आणि प्राधिकरणाने त्यांना नवीन याचिका, याचिकाकर्ते प्रकरण दाखल करण्यास पात्र ठरल्यानंतर, दाखल करण्याची मुभा दिली होती.

ब) त्यानंतर अर्जदाराने ज.सं. विभागाबरोबर १ एप्रिल २०१८ ला करार केला जो ३१ मार्च २०२४ पर्यंत वैध आहे.

क) आता अर्जदार ही याचिका, मजनिप्रा (कार्य करणे) नियमन २०१३ च्या खंड (क्लॉज) – ११ प्रमाणे दाखल करण्यास पात्र आहे.

**अशाप्रकारे या मुद्दाचे उत्तर होकारार्थी येते.**

**२) प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात या प्रकरणावर निवाडा करणे बसते काय ?**

NTPS ने याचिका प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा दर निश्चित करण्यासाठी मजनिप्राकडे दाखल केली होती. म.ज.नि.प्रा. ने त्याचा आदेश क्र. १२/२०१७, दि. १३/१०/२०१७ प्रमाणे RNPL साठी दरामधे २५ टक्के कपात करण्यास मंजुरी दिली होती. या आधारावर NTPS ने अर्ज केला होता. हा आदेश प्रकरण विनिर्दिष्ट होता जो त्यावेळी असलेल्या विलक्षण सत्यस्थिती व प्रसंगावर आधारित होता. मुद्दा असा आहे की आधी दिलेल्या सवलती प्रमाणे समानतेच्या आधरावर प्राधिकरणाने दर निश्चित करणे. त्यामुळे सदर प्रकरणात निवाडा देणे, प्राधिकरणाच्या कार्यकक्षेत येते.

**अशा प्रकारे या मुद्दाचे उत्तर होकारार्थी येते.**

३) याचिकाकर्ते २५ टक्के सवलत, समानतेच्या आधारावर व पुर्वानुलक्षी प्रभावाने मिळण्याचे हक्कदार आहे काय ? जर होय, तर कोणत्या काळाकरिता?

अ) अर्जदार हे पुर्णता समानतेच्या आधारावर विश्वासुन आहे.

अ–१) एकलहरे बंधारा हा नाशिक शहराच्या खालच्या प्रवाहात स्थित असुन सांडपाणी प्रक्रिया संयंत्रातुन सर्व प्रक्रिया न केलेले पाणी एकलहरे बंधाऱ्यात येते. जे नाशिक महानगर पालिका सांडपाणी प्रक्रिया संयंत्रातुन व खुल्या नाली/नाल्यातुन गोदावरीत सोडण्यात येते व येथुन बंधाऱ्यात येते, अर्जदाराने या संबंधात फोटो व दैनिक पत्राचे कात्रणे अभिलेखात दिली आहेत.

अ–२) RNPL ज्यांना सवलतीचा दर लागु आहे आणि NPTS, महाजेनको हे दोघेही एकाच स्त्रोतामधुन म्हणजे एकलहरे बंधाऱ्यातून पाणी घेतात.

अ–३) अर्जदाराने पाण्याचे रासायनिक विश्लेषणांचे अहवाल सुद्धा अभिलेखात ठेवले आहे.

अ–४) अर्जदाराला पाण्यावर प्रक्रिया करावी लागते ज्यासाठी वेगळा खर्च करावा लागतो. वर्ष २०१८–१९ मधे हा खर्च सरासरी १४.८१ रू. प्रति घन मीटर, होता.

ब) प्रतिवादींनी युक्तिवाद केला की,

ब–१) नाशिक महानगर पालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया संयंत्रातुन निघणारे प्रक्रिया झालेले सांडपाणी ज. सं. विभागाने RNPL ला वाटप केले आहे. तर अर्जदाराला गंगापूर धरणातुन पाण्याचे वाटप केले आहे.

गंगापूर धरण्याच्या ताज्या पाण्याचे आरक्षण अर्जदारासाठी केले असुन व ते नियमितपणे सोडण्यात येते.

अशा प्रकारे त्यांचे स्त्रोत वेगळे आहेत. ज्यामुळे RNPL ला दिला जाणारा सवलतीचा दर अर्जदाराला देऊ शकत नाही कारण त्यामधे विलक्षण सत्यस्थिती व प्रसंग हे स्पष्ट व निराळे होते.

ब–२) अर्जदाराने एकलहरे जवळ गोदावरी नदीवर बंधारा बांधला आहे, ज्यातून सोडलेले पाणी घेतले जाते. ज.सं. विभाग गंगापूर धरणातुन गोदावरी नदीत अर्जदाराच्या गरजेप्रमाणे पाणी सोडतात जे अर्जदार एकलहरे बंधाऱ्यातुन उचलतात.

ब–३) पाण्याचे विश्लेषणाचे जे अहवाल वर्ष २०१५, २०१६ व २०१७ चे त्यांच्या २१/८/०१७च्या पत्राने मिळाले आहेत; त्याप्रमाणे हे अहवाल आय.एस. २२९६ : १९९२ व आयएस १०५०० : १९९१ प्रमाणे मर्यादेच्या आत असलेले आढळुन आलेत. औष्णिक उर्जा केंद्राचे रचनेच्या मॅन्युअल प्रमाणे अर्जादाराला सुयोग्य असे प्रक्रिया संयंत्र बसविणे गरजेचे आहे, ज्यानुसार त्यांची गरज पूर्ण होईल.

ब–४) अर्जदाराने जे फोटो दिले आहेत त्यांना पुरावा समजता येणार नाही कारण त्याकरता पुराव्याचे स्त्रोत त्यांनी दिलेले नाही.

ब–५) अर्जदाराने कोणत्याही कराराशिवाय १ नोव्हेंबर २०१६ ते ३१ मार्च २०१८ च्या काळात पाणी घेतले आहे.

**प्राधिकरणाचे निष्कार्ष**

क) प्राधिकरणाने संबंधित पक्षांनी केलेल्या युक्तिवाद व अभिलेखात असलेली कागदपत्रे पाहुन, त्यांना असे आढळुन आले की,

क–१) अर्जदाराला होणारे पाणी वाटपाचा स्त्रोत गंगापूर धरण असुन RNPL ला मिळणारे पाणी हे नाशिक महानगर पालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया संयत्रातुन निघणारे प्रक्रिया झालेले सांडपाणी ज. सं. विभागाने RNPL ला वाटप केले आहे. अशा प्रकारे त्या दोघांचे स्त्रोत स्पष्टपणे वेगळे आहेत.

जल संपत्ती विभागाने अर्जदाराला गंगापूर धरणाचे पाणी मंजुर केले आहे. अर्जदाराकडे पाणी घेण्यासाठी पर्याय होते; ते सरळ धरणातुन पाणी होऊ शकत होते. ज्यामुळे प्रदुषित पाण्याचा प्रश्न उद्भवला नसता. तथापी अर्जदाराने एकलहरे येथे बॅरेज बांधुन गोदावरी नदीतुन पाणी घेण्याचा पर्याय वापरला, जे गंगापूर घरणाच्या खालच्या प्रवाहांत आहे. हे कदाचित काटकसर व सोय म्हणून केलेले असणार.

क–२) NPPS एकलहरे व ज.सं. विभागाच्या मधे दि. १६/०५/२०११ ला सही झालेल्या कराराप्रमाणे अर्जदार प्रत्येक १०,००० लिटर साठी घरघुती वापराचा २.६४ रू. चा दर व १०,००० लिटर साठी औद्योगिक वापरासाठी रू. ६४ चा दर देण्यास तयार झालेत. तर खंड (क्लॉज)–११ अन्वये RNPL ने ज.सं. विभागाशी दि. १६/०१/२०१२ व ०८/०२/२०१२ ला दोन वेगळे करार केलेत व त्यात असलेल्या तरतूदीप्रमाणे RNPL ने शासनाने वेळोवळी ठरविलेल्या दराने पाणी बील औद्योगिक दराने किंवा म.जा.नि.प्रा. ने ठरविलेल्या दराने भरण्याचे मान्य केले.

अशा प्रकारे दोन्ही पक्षांनी ज.सं. विभागाशी केलेल्या करारात पाणी दराची वेगळी तरतूद केलेली आहे. यासाठी दोन्ही पक्षांनी वेगवेगळे करार केले आहेत व कार्यान्वीत केले आहेत. अर्जदार १०,००० लिटर घरघुती वापरासाठी रु.२.६४ चा दर, तर १०,००० लिटर साठी औद्योगिक वापरासाठी रू. ६४ चा दर देण्यास तयार झालेत.

त्याउलट,

क—३) प्राधिकरणाने या प्रकरणात व RNPL च्या प्रकरणात असलेल्या समान तथा वेगळे असलेले भागाचा विचार करून व RNPL प्रकरणात क्र. ८/२०१२ मधे दिलेले विशिष्ट आदेश क्र. १२/२०१७ दि. १३/१० ला त्यामधील सत्यस्थिती व प्रसंग लक्षात घेवुन दिले होते ते आदेश असे आहेत; या प्रमाणे वाचावे.

> ''दराचे निश्चितीकरीता याचिकाकर्त्याची याचिका आम्ही स्विकार करतो. याचिकाकर्त्या कंपनी, पाणी पुरवठा च्या स्त्रोताच्या स्वरुपाच्या आधारे प्राधिकरणाच्या दि. ३० मे २०११ दर आदेशाच्या उपश्रेणी—२ अंतर्गत येते. या उपश्रेणीला रु. ६४./१० घनमी चे दर लागू आहेत. तथापि, याचिकार्त्याला एन एम सी च्या सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे व्दितीय प्रक्रिया केलेले प्रवाही चे वाटप केल्या गेले असल्यामुळे, प्राधिकरणाने त्याच्या आधिच्या प्रकरण ५/२०११ मधील उदा. १३ एप्रिल २०१२ चे आदेशात निरीक्षणाप्रमाणे दरा मध्ये २५% सवलती साठी हकदार आहेत. याप्रमाणे लागू दर रु. ४८/१० घनमी राहीतल. हे दर, १३ एप्रिल २०१२ ते ३१ ऑक्टोबर २०१७ पर्यंत लागू होतील. हा दरासंबंधीचा आदेश प्रकरण विनिर्दिष्ट आहे.
>
> प्रतिवादीचे पत्र दि. १३ जुन २०१६ हे निकालात काढण्यात आले आहे. प्रतिवादी या आदेशाच्या आधारावर सुधारित मागणी निर्गमित करतील''

पुढे, प्रकरण क्र. ५/२०११ मधे प्राधिकरणाने, RNPL प्रक्रिया केलेले पाणी वापरत असल्यामुळे, अप्रत्यक्षरिता स्वच्छ पाण्यावरील भार कमी करत आहे, त्यांना २५ टक्के सवलत दिली आहे. दि. १३/१२/२०१२ चा अनुच्छेद २८ असा आहे,

याशिवाय, मजनिप्रा (निकष ठरविण्यासाठी व घाउक पाण्यासाठी दर आदेश जारी करणे) नियमन २०१० च्या नियम १०, प्राधिकरणाला, कोणत्याही अडचणी पासून मुक्त होण्याच्या हेतू साठी अनिवार्य असल्याचे दिसून येते, तेथे असे आदेश देण्याची परवानगी देतो.

''(१०) अडचणी हटविण्याकरिता शक्ती

या नियमनाच्या तरतुदी लागु करण्यात जर काही अडचणी येत असतील तर, प्राधिकरण साधारण किंवा विशिष्ट आदेश काढू शकेल, जो अधिनियमातील तरतुदींच्या विरोधात असणार नाही व अडचणी दूर करण्यास आवश्यक व समयोचित राहील.''

प्रस्तुत प्रकरणात, आधी दिलेल्या कारणांप्रमाणे, नवीन निकष लावण्यापुर्वी, नियमन ३ लागु करण्याकरिता सार्वजनिक संमंत्रणा प्रक्रिया पुर्ण करण्यात अडचणी आहेत. तथापी, मजनिप्रा नियमन १० (निष्कर्ष निश्चित करणे व घाऊक पाण्याचा दर लागु करणे) नियमन २०१० ने जी शक्तीप्रदान केली आहे, तिचा वापर, अनुच्छेद २६ (१) व (२) मधे, दिलेल्या विकल्पांसाठी करता येणार नाही, कारण ते अधिनियमाच्या कलम ११ (डी) शी असंगत होईल. दुसऱ्या बाजुला, नियमनामधील अडचणी दुर करण्याकरता प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करता येईल, ज्या योगे निकषाच्या अनुच्छेद १३.३.२ चा अंमल दुर करून प्रक्रिया केलेले सांडपाण्याचा औद्योगिक वापर करवून त्याद्वारे अप्रत्यक्षपणे स्वच्छ पाण्याच्या मागणीवरील भार कमी करता येईल. जर हा निकष अर्जदाराच्या

प्रकरणांत लागु केला तर तो अधिनियमांच्या कोणत्याही तरतुदींना असंगत ठरणार नाही आणि परिणामस्वरूप दरामधे कपात २५ टक्के पर्यंत करणे शक्य होईल.

सध्याच्या प्रकरणात अर्जदाराकरिता पाणी गंगापूर धरणातुन सोडण्यात येते. अशाप्रकारे स्वच्छ/ताज्या पाण्याची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रितीने बचत होत नाही.

प्राधिकरणाने या प्रकरणात असलेले व वर दिलेले विलक्षण सत्य स्थिती व प्रसंगांचा विचार करून असे मत दिले की अर्जदार हे RNPL ला मिळणाऱ्या लाभाचे हक्कदार होऊ शकत नाही.

**अशा प्रकारे या मुद्दाच्या दोन्ही भागांचे उत्तर नकारार्थी येते.**

(४) येथे दुसरा कोणता मुद्दा विचारात घेण्यायोग्य, या प्रकरणासोबत आहे काय? जर होय, तर कसा?

या प्रकरणात हे खरे आहे की, जल संपत्ती विभागाने १९७७ मधे गोदावरी नदीतून एकलहरे गावाजवळ १२०० द.ल.घ. फुट पाणी घेण्याची परवानगी दिली आहे. आता NTPS चा कार्यकारी अभियंता, नाशिक सिंचन विभाग, जल संपत्ती विभाग यांच्या बरोबर ७०० द.ल.घ.फु. पाणी पुरवठयाचा करार झाला आहे. या कराराचा अवधी ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२४ पर्यंत आहे. गंगापूर धरण हे उर्ध्व गोदावरी उपखोऱ्यात आहे ज्यामधे पाण्याची टंचाई आहे. गंगापूर धरण नाशिक महानगर पालिकेला पेय जलाचा पुरवठा करते. नाशिक शहराची पेयजलाची मागणी वाढली आहे. गंगापूर धरणाची चल साठवण क्षमता व वार्षिक वापर अनुक्रमे २०३.८८ द.ल.घ.मी. व २३१.८२ द.ल.घ.मी. आहे. एकूण वार्षिक वापरापैकी घरघुती पाणी वापराचे आरक्षण ७७.३६ द.ल.घ.मी. व औद्योगिक आरक्षण, NTPS ला धरून ७३.५२ द.ल.घ.मी. आहे. यामुळे शेतीच्या सिंचन कोटयामधे घट झाली आहे. क्षेत्रीय वाटप जे कॅबीनेट उपसमितीने म.ज.नि.प्रा. अधिनियम २००५ अंतर्गत कलम १६ (ए) अन्वये १५ टक्के घरघुती पाणी वापराला व औद्योगिक वापराला १० टक्के मंजुर केले आहे. या विरूद्ध, वास्तविक घरघुती व औद्योगिक वापराची मागणी अनुक्रमे ३३ टक्के व ३२ टक्के आहे. घरघुती वापरासाठी ताज्या पाण्याचा पुरवठा करणे अनिवार्य

आहे. तथापि, प्रक्रिया केलेले सांडपाणी औद्योगिक वापरासाठी उपयोगात आणता येते; ज्यामुळे ताज्या पाण्याच्या मागणीचा ताण कमी करता येऊ शकतो.

ब) ही प्रशंसनीय बाब सुद्धा आहे की भारत सरकारने नवीन दराची निती २८/०१/२०१६ ला अधिसुचित केली आहे, ज्यामधे आदेशीत केले आहे की औष्णिक वीज केंद्र जे अस्तित्वात आहेत ते धरून, नगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था वा तत्सम संस्थांच्या सांडपाणी प्रक्रिया संयंत्रांच्या ५० कि.मी. त्रिजेच्या आत येतात. त्यांनी प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरावे जे आसपासच्या सांडपाणी प्रक्रिया संयंत्रांच्या मधुन तयार होईल व या करता येणारा खर्च पाणी दरातुन करावा अर्जदाराचे औष्णिक वीज केंद्र नाशिक महानगर पालिकेच्या नगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था वा तत्सम संस्थांच्या सांडपाणी प्रक्रिया संयंत्रांच्या ५० कि.मी. च्या आत आहे.

क) त्यानंतर महाराष्ट्र शासनांच्या नगर विकास विभागाने उर्जा विभाग व ज.सं. विभागांच्या संमतीने, ३० नोव्हेंबर २०१७ चा शा. नि. निर्गमित केला असुन त्यात सुद्धा म्हटले आहे की औष्णिक वीज केंद्र जे अस्तित्वात आहेत ते धरून, नगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था वा तत्सम संस्थांच्या सांडपाणी प्रक्रिया संयंत्रांच्या ५० कि.मी. त्रिजेच्या आत येतात. त्यांनी प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरावे. ज्यामुळे ताज्या पाण्याच्या मागणीचा ताण कमी करता येऊ शकतो.

ड) जो आदेश प्राधिकरणाला मिळाला आहे त्याप्रमाणे प्राधिकरणाने राज्याच्या जलसंपत्तीचे नियमन करून त्याची खात्री करून घ्यावी. या प्राधिकरणाने म.ज.नि.प्रा. (सुधारणा व चालु ठेवणे) अधिनियम २०११ च्या कलम ११ मधे दिलेल्या तरतूदीनुसार पाण्याच्या हक्काच्या वितरणाचे निकष दि. २२/०९/२०१७ ला निश्चित केले आहे. या निकषामधे

प्राधिकरणाने आदेशित केले आहे की राज्यातील औष्णिक वीज केंद्र यांनी राष्ट्रीय पाणी दर नीती प्रमाणे प्रक्रिया केलेले पाणी वापरावे तसेच पुढे आदेशित केले आहे की राज्यातील औष्णिक वीज केंद्र यांनी राष्ट्रीय पाणी दर नीती प्रमाणे प्रक्रिया केलेले पाणी वापरावे तसेच पुढे आदेशित केले आहे की नदी खोरे अभिकरणाने हे निश्चित करावे की औष्णिक वीज केंद्र प्रक्रिया केलेले पाणी वापरावे तसेच पुढे आदेशित केले आहे की नदी खोरे अभिकरणाने हे निश्चित करावे की औष्णिक वीज केंद्र प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर करीत आहे.

इ) राज्य पाणी नीती – २०१९ मधे ताज्या पाण्याच्या मागणी वरील ताण कमी करण्याचा मानस आहे, त्यांनी सुद्धा आदेशित केले आहे की औष्णिक वीज केंद्र जे अस्तित्वात आहेत ते धरून, नगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था वा तत्सम संस्थांच्या सांडपाणी प्रक्रिया संयंत्रांच्या ५० कि.मी. त्रिजेच्या आत येतात, त्यांनी प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरावे.

फ) गंगापूर धरण हे उर्ध्व गोदावरी उपखोऱ्यात आहे ज्यामधे पाण्याची टंचाई आहे. या प्राधिकरणाचे विचारांची असे मत आहे की अर्जदार व प्रतिवादींनी या दोघांनी वर दिलेल्या वैधानिक तरतुदीच्या आदेशाची अंमलबजावणी निश्चित कालावधी मधे करावी; आणि म्हणून प्राधिकरणाला हे अनिवार्य वाटते की यामधे ताज्या पाण्याच्या मागणीवरील ताण कमी करण्यासाठी आवश्यक निर्देश द्यावेत.

या मुद्याचे उत्तर या प्रमाणे असुन संबंधित निर्देश या आदेशाच्या कार्यान्वित भागात, राज्यातील हितकर्त्यांचे एकूण हित लक्षात घेता, निर्गमित करण्यात येत आहे.

## निर्देश

२०) अशाप्रकारे वादात असणाऱ्या पक्षांचे विचार ऐकून व असलेल्या अभिलेखांचा, केलेल्या सादरीकरण्याचा विचार करून, साचेबद्ध केलेल्या मुद्दांवर वरील प्रमाणे निवाडा दिला आहे, त्यावरून प्राधिकरण निर्देश येते की,

१) अपीलार्थी हे कोणत्याही दर सवलत घेण्याचे हक्कदार नाहीत. त्यामुळे त्यांनी केलेली प्रार्थना नाकारली आहे.

२) जी सत्यस्थिती व वैधानिक तरतूदी, वर अनुच्छेद १९ (४) मधे दिल्या आहेत, त्याप्रमाणे अर्जदार प्रक्रिया केलेले पाणी, ठरलेल्या कालमर्यादित हा करार संपण्यापुर्वी वापरायला सुरू करतील, ज्याकरिता त्यांना ३१/०३/२०२४ पर्यंत भरपुर वेळ आहे व ज्यामुळे ताज्या पाण्यावरील मागणीचा ताण कमी होईल.

३) अर्जदाराने शपथपत्राद्वारे हमी द्यावी, जे अर्जदार कंपनीच्या जबाबदार प्राधिकृत अधिकाऱ्याने सही केलेले असेल व यामधे प्रक्रिया केलेले पाणी ठरलेल्या कालमर्यादित त्यांचा सध्याचा करार संपण्यापूर्वी, वापरण्याकरिता निश्चित योजना द्यावी. या करिता त्यांचेकडे दि. ३१/०३/२०२४ पर्यंत भरपुर वेळ आहे. असे हमीपत्र या प्राधिकरणाकडे या आदेशाच्या तारखेच्या ६० दिवसाच्या आता दाखल करावे.

४) प्रतिवादींना निर्देश देण्यात येताता की त्यांनी अर्जदार, ज्यामधे प्रक्रिया केलेले पाणी ठरलेल्या कालमर्यादित करण्यासाठी केलेल्या निश्चित कार्यक्रमाची अंमलबजावणी करीत आहे आणि त्याप्रमाणे असलेल्या (ताज्या पाण्याचा पुरवठा) करारांचे नवीनीकरण करण्याची गरज दि. ३१/०३/२०२४ नंतर पडणार नाही, याची खात्री करून घ्यावी.

अशाप्रकारे याचिका वर दिलेल्या निर्देशानुसार खर्चाविना निकालात काढली आहे.

दि. ०५/०३/२०२० ला जारी केले.

| | |
|---|---|
| स्वा. | स्वा. |
| (विनोद जे. तिवारी) | (व्ही. एम. कुळकर्णी) |
| सदस्य (विधि) | सदस्य (ज.सं.अभियांत्रिकी) |

स्वा.

के. पी. बक्षी

अध्यक्ष